ICE 'n' SPICE
व्हेज रेस्टॉरन्ट
पंजाबी डिशेस् । पावभाजी । चाईनीज । ज्युसेस् । आईस्क्रीम
गोदावरी कॉम्प्लेक्स,व्ही.आय.पी.रोड,नांदेड
मो. 9422172572, 9850430189

सायं दैनिक
नांदेड वार्ता
www.nandedwarta.com

• वर्ष २५ वे • अंक ५० • शनिवार दि.१४ नोव्हेंबर २०२६ • नांदेड • पोस्ट परवाना/एनएनडी/आरएनपी-२६२/२०२६-२०२८ • पाने ४ • किंमत १ रु.

डिलिमिटेशन बिलावरुन राजकीय संघर्ष पेटला

रा.काँ.च्या समर्थनाचे बावनकुळेंकडून स्वागत;खा.सुळे,आ.वडेट्टीवार यांच्यात आरोप प्रत्यारोप



मुंबई/प्रतिनिधी- राष्ट्रवादी काँग्रेसच्या खा.सुप्रिया सुळे यांनी डिलिमिटेशनला सकारात्मक प्रतिसाद दिल्यानंतर महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी त्यांच्या भूमिकेचे स्वागत केले आहे. दुसरीकडे, काँग्रेसने या प्रक्रियेवर आक्षेप घेतल्याने बावनकुळे यांनी काँग्रेसवर जोरदार टीका केली. काँग्रेसकडे कोणतेही ठोस व्हिजन नसून इंडिया आघाडीलाही आपले घटक पक्ष सांभाळता येत नसल्याचा आरोप त्यांनी केला. मात्र, सुप्रिया सुळे यांनी काँग्रेसचा उल्लेख केल्याने काँग्रेसचे आ. विजय वडेट्टीवार यांनी संताप व्यक्त करीत त्यांना काँग्रेसचे नाव पुढे न करण्याचा सल्ला दिला. त्यामुळे डिलिमिटेशनच्या मुद्द्यावरून सत्ताधारी आणि विरोधकांमध्ये आरोप-प्रत्यारोपांचे राजकारण रंगले आहे.

लोकसभा आणि विधानसभा मतदारसंघांच्या पुनर्रचनेच्या (डिलिमिटेशन) मुद्द्यावरून महाराष्ट्रातील राजकीय वातावरण चांगलेच तापले आहे. डिलिमिटेशनचे समर्थन करताना बावनकुळे यांनी मोठ्या मतदारसंघांमुळे लोकप्रतिनिधींना येणाऱ्या अडचणींचा मुद्दा उपस्थित केला. रामटेक लोकसभा मतदारसंघाचे उदाहरण देताना ते म्हणाले की, या मतदारसंघात सहा विधानसभा मतदारसंघांचा समावेश आहे. एवढ्या मोठ्या मतदारसंघात काम करणे खासदारासाठीही कठीण ठरते. कामठी विधानसभा मतदारसंघात सुमारे साडेपाच लाख मतदार असतील, तर एका आमदाराने एवढ्या मोठ्या मतदारसंघातील प्रत्येक नागरिकापर्यंत कसे पोहोचायचे, असा सवाल त्यांनी उपस्थित केला. मतदारसंघांचा आकार लहान असेल तर लोकप्रतिनिधींचा जनतेशी संपर्क अधिक चांगला राहील. नागरिकांच्या समस्या जाणून घेणे, विकासकामांवर लक्ष ठेवणे आणि शासकीय योजनांचा लाभ सर्वसामान्यांपर्यंत पोहोचविणे अधिक सोपे होईल. जेवढा छोटा मतदारसंघ, तेवढा जनसंपर्क चांगला आणि विकासाला अधिक चालना मिळेल, अशी भूमिका त्यांनी मांडली. लोकसभा आणि विधानसभा या दोन्ही स्तरांवर डिलिमिटेशन होणे आवश्यक असल्याचे सांगतानाच महिलांसाठी ३३ टक्के आरक्षणाची अंमलबजावणीही महत्त्वाची असल्याचे त्यांनी नमूद केले. डिलिमिटेशनच्या मुद्द्यावर सुप्रिया सुळे यांनी मांडलेल्या भूमिकेचे बावनकुळे यांनी स्वागत केले. प्रत्येक राज्यातील जागांमध्ये ५० टक्के वाढ करण्याचा प्रस्ताव असेल आणि सर्व राज्यांना समान निकषांनुसार जागा मिळणार असतील, तर त्यावर सकारात्मक विचार करण्यास हरकत नाही, अशी भूमिका सुप्रिया सुळे यांनी मांडली होती. मतदारसंघांची **पान ४ वर**

ना.संजय शिरसाट यांच्या घरावरील हल्ल्याचे गूढ उकलले!

छत्रपती संभाजीनगर/प्रतिनिधी- शिवसेनेचे नेते तथा राज्याचे सामाजिक न्याय मंत्री आणि छत्रपती संभाजीनगरचे पालकमंत्री संजय शिरसाट यांच्या निवासस्थानावर गुरुवारी मध्यरात्री झालेल्या हल्ल्याप्रकरणी धक्कादायक माहिती समोर आली आहे. या प्रकरणी पोलिसांनी तीन संशयित आरोपींना अटक केली असून, चौकशीदरम्यान हा प्रकार राजकीय वैमनस्यातून नव्हे, तर दारूच्या नशेत सुरक्षारक्षकांसोबत झालेल्या वादातून घडल्याचे प्राथमिक तपासात समोर आले आहे. विशेष म्हणजे, अटक करण्यात आलेले तिन्ही तरुण उच्चशिक्षित असून, त्यातील एक तरुण जर्मनीतील खासगी कॅम्पनीत नोकरीला असल्याची माहिती पोलिसांनी दिली आहे. हल्ल्याची संपूर्ण घटना निवासस्थानाबाहेरील सीसीटीव्ही कॅमेऱ्यांत कैद झाली आहे.

राज्याचे समाजकल्याण मंत्री संजय शिरसाट यांच्या छत्रपती संभाजीनगर येथील निवासस्थानाबाहेर गुरुवारी रात्री उशिरा तीन तरुणांनी गोंधळ घालत हल्ल्याचा प्रयत्न केला होता. या घटनेनंतर पोलिसांनी तातडीने तपासाची चक्रे फिरवून तिघांना ताब्यात घेतले. रोहित भूताळ, शिवम गायकवाड आणि प्रतीक कुटे अशी अटक करण्यात आलेल्या तरुणांची नावे आहेत. यातील रोहित भूताळ हा जर्मनीतील एका खासगी कॅम्पनीत नोकरी करीत होता. तर शिवम गायकवाड हा एम.एस्सी. पदवीधर असून, **पान ४ वर**

नांदेड एज्युकेशनचे क्रीडा क्षेत्रात महत्त्वपूर्ण योगदान-आयुक्त डोईफोडे



नांदेड/प्रतिनिधी- शिक्षणासोबतच क्रीडा क्षेत्राच्या विकासात नांदेड एज्युकेशन सोसायटीचे योगदान अत्यंत महत्त्वपूर्ण आहे. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी शैक्षणिक उपक्रमांसोबत क्रीडा सुविधांना प्राधान्य देण्याची संस्थेची परंपरा कौतुकास्पद आहे. असे प्रतिपादन महापालिका आयुक्त डॉ. महेशकुमार डोईफोडे यांनी केले.

कोहिनूर उद्योग समुह आणि नांदेड एज्युकेशन सोसायटीच्या एनईएस सायन्स कॉलेज यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित एमटी २०० वर्ल्ड मास्टर्स लॉन टेनिस चॅम्पियनशिप-२०२६ या आंतरराष्ट्रीय स्पर्धेच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. १४ ते १९ नोव्हेंबर दरम्यान सायन्स कॉलेज येथील सदाशिवराव पाटील क्रीडा संकुलात ही स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी नांदेड एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष सीए डॉ. प्रवीण पाटील होते. प्रमुख पाहुणे म्हणून एनईएसच्या सचिव श्यामल पत्की, पत्रकार शंतनू डोईफोडे आणि नांदेड क्लबचे सचिव डॉ. मनीष देशपांडे, अली पंजवानी आणि एस. हरजींदरसिंग चिरागिया उपस्थित होते. आंतरराष्ट्रीय स्तरावरील या स्पर्धेमुळे नांदेडमधील टेनिस खेळाडूंना दर्जेदार खेळ पाहण्याची आणि आंतरराष्ट्रीय खेळाडूंच्या कौशल्याचा अनुभव घेण्याची संधी मिळणार असल्याचे सीए डॉ.प्रविण पाटील यांनी अध्यक्षीय समारोपात सांगितले. संस्थेने जाणिवपूर्वक ग्रामीण व गरीब विद्यार्थी व तरुणांना लॉन टेनिस सारख्या खेळात संधी मिळावी यासाठी अलीभाई पंजवानी व महाराष्ट्र लॉन टेनीस संघटनेच्या सहकार्यातून या स्पर्धांचे आयोजन करण्यात आल्याचे त्यांनी सांगितले. यावेळी एनईएसचे सहसचिव ॲड.प्रदीप नागापूरकर, सायन्स कॉलेजचे प्राचार्य डॉ. लक्ष्मण शिंदे, स्वारातीम विद्यापीठाचे माजी क्रिडा विभाग प्रमुख प्रा.जीवन गाडेगावकर, पीपल्स हायस्कूल शालेय समितीचे अध्यक्ष स.नौनिहालसिंघ जहागीरदार, चिरंजीलाल दागडीया, उपप्राचार्य एकनाथ खिल्लारे, प्रा.अरुणा शुक्ला यांच्यासह क्रिडा प्रेमी उपस्थित होते. उद्घाटन सत्राचे सुत्रसंचालन व आभार प्रदर्शन आणि एनईएसचे क्रीडा संचालक डॉ. अश्विन बोरिकर यांनी केले. स्पर्धेच्या आयोजनाची जबाबदारी सांभाळली आहे. १९ नोव्हेंबरपर्यंत चालणाऱ्या या स्पर्धेमुळे नांदेडच्या क्रीडा क्षेत्रात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे.

काँग्रेसच्यावतीने नेहरु,मौलाना आझाद, लहुजी साळवे यांची जयंती साजरी

नांदेड (प्रतिनिधी) - शहर व जिल्हा काँग्रेस कमिटीच्या वतीने स्वतंत्र भारताचे पहिले पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू, पहिले केंद्रीय शिक्षणमंत्री मौलाना अबुलकलाम आझाद, क्रांतिकारक लहुजी साळवे यांची संयुक्त जयंती काँग्रेस कार्यालय येथे शनिवार (ता.१४) रोजी मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आली.

स्वतंत्र भारताचे पहिले पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू, पहिले केंद्रीय शिक्षणमंत्री मौलाना अबुलकलाम आझाद, क्रांतिकारक लहुजी साळवे यांची संयुक्त जयंती साजरा करत शहर व जिल्हा काँग्रेस कमिटीच्या वतीने अभिवादन करण्यात आले. यावेळी खा. रवींद्र चव्हाण यांच्या नेतृत्वात व महानगराध्यक्ष अब्दुल गफ्फार यांच्या पुढाकाराने अनेकांच्या काँग्रेस पक्षप्रवेशासह संघटनात्मक नियुक्त्या करण्यात आल्या. दरम्यान महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस विचार विभागाच्या नांदेड उत्तर जिल्हाध्यक्षपदी आनंदराव कल्याणकर, दक्षिण जिल्हाध्यक्षपदी डॉ. शेषराव फुलवरे, महानगराधक्षपदी डॉ. हरी पाटोडे, उत्तर महासचिवपदी सदाशिव आडेराव व दक्षिण महासचिवपदी विठ्ठल आसुरे आदीची नियुक्ती करण्यात आली. यावेळी खा. रवींद्र चव्हाण, महानगराधक्ष अब्दुल गफ्फार, डॉ. श्रावण रॅपनवाड, डॉ. रेखा चव्हाण, आनंद चव्हाण, नगरसेवक मुन्ना अब्बास, सत्यपाल सावंत, महेश देशमुख तरोडेकर, श्रीनिवास मोरे, अजिज कुरेशी, गणेश ढगे, डॉ. अनंत राऊत, आनंद कल्याणकर, शंकर शिंदे, गगन यादव, बाळासाहेब देशमुख, ब्लॉक अध्यक्ष बापूसाहेब पाटील, दिपकसिंग हुजारिया, संजय वाघमारे, ज्योती कदम, देशमुख ताई, नसिम पठाण, मधुकर दिघे, गोविंद पाटील, श्यामराव मनाठकर, प्रकाश दिपके आदीसह इतर मान्यवर उपस्थित होते.

आजीबाईंच्या दीड लाखांची पर्स परत;ऑटोचालकाचा प्रामाणिकपणाचे सर्वत्र कौतुक



देगलूर/प्रतिनिधी- प्रामाणिकपणा आजही जिवंत असल्याचा प्रत्यय देगलूरमधील एका घटनेतून आला आहे. शेख याकूब या ऑटोचालकाने आपल्या रिक्षात विसरलेले सोन्याचे दागिने, रोख रक्कम आणि महत्त्वाचे साहित्य कोणतीही मोह माया न बाळगता संबंधित आजीबाईंना परत केले आहे. परत केलेल्या दागिन्यांची व पैशांची अंदाजे किंमत दीड लाख रुपयांपर्यंत असल्याचे त्यांच्या नातेवाईकांकडून सांगितले जात असून, त्यांच्या या तत्परतेचे आणि इमानदारीचे सर्वत्र कौतुक होत आहे.


मिळालेल्या माहितीनुसार, मूळ मुखेड तालुक्यातील सावरमाळ येथील एक वृद्ध महिला जनाबाई कोंडीबा अज्जेवाड ह्या आपल्या माहेरी सुगाव तालुका देगलूर येथे प्रवास करीत होत्या. आजीबाईंनी देगलूर शहरातून प्रवासासाठी शेख याकूब यांची ऑटो रिक्षा केली होती. आपल्या इच्छित स्थळी उतरताना घाईगडबडीत त्या आपली बॅग रिक्षातच विसरून गेल्या. या बॅगेत सोन्याचे मौल्यवान दागिने, रोख रक्कम आणि कपडे असा सुमारे १.५ लाख रुपये किमतीचा ऐवज होता. काही वेळाने शेख याकूब यांच्या नजरेस ही बॅग पडली. बॅगमध्ये दागिने आणि पैसे असल्याचे लक्षात येताच, त्यांनी क्षणाचाही विलंब न लावता थेट देगलूर पोलीस स्टेशन गाठले. कारण याकूब शेख यांचा मुलगा सुद्धा ठाणे शहर येथे पोलिसात कर्तव्य बजावत आहे. म्हणून प्रथम प्राधान्याने त्यांनी पोलिसांची निवड केली. तथा बॅगेतील सर्व ऐवज पोलिसांच्या स्वाधीन करून घडलेला सर्व प्रकार सांगितला. पोलिसांनी तत्परता दाखवत याकुब शेख यांच्या कडे असलेल्या बॅगेतील आधार कार्डच्या माध्यमातून त्यांच्या नातेवाईकांना **पान ३ वर**

किनवटमध्ये वन्य प्राण्यांचा पाण्यासाठी मानवी वस्तीत भटकंती

वन्य प्राण्यांसह नागरिकांसाठी पाण्याचे नियोजन करा-आ.केराम

किनवट/प्रतिनिधी- जंगली भागातील तलावाच्या पाणी पातळीत कमालीची झपाट्याने घट होत असल्याने हिंस्त्र प्राण्यांनी मानव वस्त्यांकडे पाण्यासाठी आश्रय घेतल्याचे चित्र पाहायला मिळते. त्याच पार्श्वभूमीवर किनवट वनविभागाच्या कार्यक्षेत्रातील अंबाडी नियतक्षेत्रात वनपथकाने गस्त घालत परिसरातील नागरिकांना सतर्कतेचा इशारा दिलाय. आ.भीमराव केरामांनी सुद्धा वन्य प्राण्यांसह लोकांच्या पिण्याच्या पाण्याच्या टंचाई प्रश्नांवर संबंधितांना सूचना दिल्याचे सूत्रांनी सांगितले.

या वर्षीच्या पावसाळ्यात जेमतेम नगन्य पर्जन्यमान झाल्याने ऑक्टोबर महिन्यापासूनच लोकांच्या आणि वन्यजीवांच्या पिण्याच्या पाण्याचे दुर्भिक्ष निर्माण झाल्याचे भिषण चित्र पाहायला मिळते. जंगलातील पाण्याचे स्त्रोत खंडित झाले आहेत. म्हणून अस्वलांसह अन्य वन्यप्राण्यांच्या पिण्याच्या पाण्याचा प्रश्न गंभीर बनला आहे. जंगल सोडून मानव वस्तीचा आश्रय रस्ता धरल्याचे अनेक उदाहरणे आहेत. परवाच अंबाडी शेतीशिवारात एका अस्वलाचा रस्त्याने मुक्तवावर होत असतांना एका शेतकऱ्याने मोबाईलमध्ये अस्वलाचे क्षणचित्रे शूटिंग केलीत. सध्या शेतकरी कापूस पिकाला आणि रब्बी हंगामातील पीकांना पाणी देण्यात व्यस्त आहेत. शिवाय कापूस वेचणीसाठी महिला शेतमजुरांची झुंबड शेतात दिसतात. अशातच अस्वलं जंगल सोडून थेट शेतीशिवारात आणि मानव वस्तीकडे धाव घेत असल्याने सालगडी, शेतमजूर व शेतकरी कमालीचे धास्तावले आहेत. रात्रीच्या वेळी शेतात कसे राहावे असा मोठा प्रश्न त्यांच्यासमोर उभा ठाकला आहे. वीज वितरण कॅम्पनीकडून ग्रामीण भागात रात्रीच्या वेळी वीज पुरवठा केला जात असल्याने पिकांना पाणी देण्यासाठी शेतकऱ्यांना जीव धोक्यात घालून रात्र जागून काढावी लागत आहे. घोटी, कमठाला, अंबाडी व इतर गावांच्या शेतकऱ्यांनी दिवसा वीज पुरवठा करण्याची मागणी करत भोकरचे कार्यकारी अभियंता कुरेशी यांना किनवट येथे घेराव घालून आंदोलन केले होते. मात्र, त्यानंतरही दिवसा वीज पुरवठा करण्याचे वीज वितरण कॅम्पनीचे आश्वासन केवळ हवेतच विरले. विशेष म्हणजे, ज्या अधिकाऱ्यांनी शेतकऱ्यांना आश्वासन दिले होते, त्याच कार्यकारी अभियंता कुरेशी यांच्यावर नंतर निलंबनाची कारवाई झाली. आता त्यांच्या जागी नव्याने नेमणूक झालेले कार्यकारी अभियंता शेतकऱ्यांच्या या ज्वलंत प्रश्नाची दखल घेणार का? असा संतप्त सवाल वन्यप्राण्यांच्या त्रासाने भयभीत झालेले शेतकरी विचारत आहेत. आगामी काळात केवळ वन्यप्राण्यांचाच नव्हे तर मानवाच्या पिण्याच्या पाण्याचाही गंभीर प्रश्न निर्माण होऊ नये म्हणून आमदार केराम यांनी आतापासूनच खबरदारी घेत टंचाई संदर्भात उपाययोजना राबवण्यासाठी प्रशासनाला सातत्याने सूचना देत आहेत. भटक्या अस्वलासंबंधी नागरिकांनी वनविभागाला कळविल्यानंतर स्थानिकचे सहाय्यक वनसंरक्षक किरण चव्हाण आणि किनवटचे वनपरिक्षेत्र अधिकारी धीरज मदने यांच्या मार्गदर्शनाखाली अंबाडी नियतक्षेत्राच्या वनपाल मिरा टोंम्पेंच्या पथकातील वनरक्षक मुकींद डोईफोडे, वनमजूर भोजू जाधव, व्यंकट मडावी, कैलास जाधव यांनी अंबाडी नियतक्षेत्रात प्रत्यक्ष पाहणी करत अस्वलाचा वावर असलेल्या भागात गस्त घालून परिसरातील नागरिकांना सतर्क राहण्याच्या सूचना दिल्याचे वृत्त आहे.



आरोपांची आतषबाजी, पुराव्यांचा दुष्काळ!

भारतीय संसदीय लोकशाहीत सत्ताधारी आणि विरोधक यांच्यात संघर्ष असणे स्वाभाविक आहे. किंबहुना सत्ताधाऱ्यांच्या निर्णयांवर प्रश्न उपस्थित करणे आणि सरकारला जाब विचारणे हे विरोधी पक्षाचे घटनात्मक कर्तव्यच आहे. त्याचबरोबर देशाच्या पंतप्रधानपदावर विराजमान असलेल्या व्यक्तीवरही देशहित, राष्ट्रीय सुरक्षा आणि लोकशाही मूल्यांचे रक्षण करण्याची मोठी जबाबदारी असते. मात्र, जेव्हा देशातील सर्वोच्च पदांवर असलेले नेतेच एकमेकांवर गंभीर आरोपांच्या फैरी झाडू लागतात आणि त्या आरोपांना पुराव्यांची जोड मिळत नाही,तेव्हा लोकशाहीच्या विश्वासार्हतेवरच प्रश्नचिन्ह निर्माण होते. लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी समाजमाध्यमांवर व्हिडिओ प्रसारित करून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याकडून आपला फोन टॅप केला जात असल्याचा आरोप केला. एवढेच नव्हे, तर आपल्या फोनमध्ये पंतप्रधानांच्या कथित देशद्रोही कृत्यांचे अनेक पुरावे असल्याचा दावाही त्यांनी केला. दुसरीकडे, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी राहुल गांधी यांच्यावर चीनकडून आर्थिक मदत घेत असल्याचा आरोप केल्याचे सांगितले जाते. केंद्र सरकारविरोधात होणाऱ्या आंदोलनांमागे काँग्रेसला परदेशातून आर्थिक मदत मिळत असल्याचे आरोपही भाजपकडून वारंवार केले जातात. या आरोपांची गंभीरता लक्षात घेतली तर हा केवळ दोन राजकीय पक्षांमधील संघर्ष राहत नाही, तर देशाच्या सार्वभौमत्वाशी, राष्ट्रीय सुरक्षेशी आणि लोकशाहीच्या प्रतिष्ठेशी संबंधित विषय बनतो. पंतप्रधान नरेंद्र मोदी गेल्या बारा-तेरा वर्षांपासून देशाचे नेतृत्व करीत आहेत. राहुल गांधी हेही गेल्या अनेक वर्षांपासून राष्ट्रीय राजकारणातील महत्त्वाचे नेते असून सध्या लोकसभेतील विरोधी पक्षनेते आहेत. दोघांकडेही संसदीय लोकशाहीने दिलेली महत्त्वाची जबाबदारी आहे. संसदेचे अधिवेशन, चर्चेचे व्यासपीठ, प्रश्नोत्तरांचा तास, विशेषाधिकार, चौकशीची मागणी आणि विविध संसदीय आयुधे उपलब्ध असताना आरोप-प्रत्यारोपांसाठी समाजमाध्यमे आणि राजकीय व्यासपीठांचाच आधार का घेतला जातो, हा खरा प्रश्न आहे. एखाद्या व्यक्तीचा फोन बेकायदेशीररीत्या टॅप केला जात असेल तर तो नागरिकांच्या खासगी स्वातंत्र्यावर आणि मूलभूत अधिकारांवर घाला आहे. त्यासाठी संबंधित यंत्रणांकडून निष्पक्ष चौकशी झाली पाहिजे. राहुल गांधी यांच्याकडे पंतप्रधानांविरोधात देशद्रोहाचे पुरावे असल्याचा दावा असेल, तर त्यांनी ते योग्य घटनात्मक आणि कायदेशीर यंत्रणांसमोर सादर करायला हवेत. केवळ व्हिडिओ प्रसिद्ध करून किंवा माध्यमांसमोर आरोप करून जनतेच्या मनात संशय निर्माण करणे पुरेसे नाही. त्याचप्रमाणे राहुल गांधी यांच्यावर चीनकडून आर्थिक मदत घेतल्याचा आरोप करणाऱ्यांनीही त्या आरोपांचे ठोस पुरावे देशासमोर ठेवले पाहिजेत. राजकारणात आरोप करणे सोपे असते; मात्र ते सिद्ध करण्याची जबाबदारीही तितकीच महत्त्वाची असते. देशातील कोट्यवधी नागरिकांना आज महागाई, बेरोजगारी, शेतकऱ्यांचे प्रश्न, शिक्षण, आरोग्य आणि आर्थिक अस्थिरता अशा असंख्य समस्यांनी ग्रासले आहे. या प्रश्नांवर सत्ताधारी आणि विरोधकांनी एकत्रितपणे चर्चा करणे अपेक्षित असताना देशातील राजकारण आरोपांच्या चिखलफेकीत अडकले आहे. कोण कोणाच्या इशाऱ्यावर चालतो, कोणाला परदेशातून मदत मिळते, कोण देशद्रोही आहे आणि कोणाचा फोन टॅप होतो, याच चर्चेत राजकीय शक्ती खर्च होत आहे. लोकशाहीमध्ये विरोधकांना शत्रू समजण्याची आणि सत्ताधाऱ्यांना प्रश्न विचारणाऱ्यांना देशविरोधी ठरविण्याची प्रवृत्ती घातक आहे. त्याचवेळी सत्ताधाऱ्यांवर गंभीर आरोप करून ते सिद्ध करण्याची जबाबदारी टाळणे हेही योग्य नाही. देशाच्या पंतप्रधानांविषयी किंवा विरोधी पक्षनेत्यांविषयी केलेल्या आरोपांकडे जनतेने केवळ राजकीय मनोरंजन म्हणून पाहू नये. कारण या आरोपांमुळे देशाच्या सर्वोच्च घटनात्मक संस्थांच्या प्रतिष्ठेवर परिणाम होत असतो. राहुल गांधी यांच्याकडे पुरावे असतील तर त्यांनी ते देशासमोर आणावेत. मोदी सरकारकडे राहुल गांधी यांच्या परदेशी आर्थिक संबंधांबाबत पुरावे असतील तर त्यांनीही तपास यंत्रणांमार्फत सत्य जनतेसमोर मांडावे. आरोप खरे असतील तर कारवाई झालीच पाहिजे आणि आरोप खोटे असतील तर संबंधितांनी जनतेची माफी मागितली पाहिजे. दोन्ही बाजूंनी केवळ राजकीय वक्तव्ये करून जबाबदारी झटकणे ही जनतेची दिशाभूल आहे. संसद हे लोकशाहीचे सर्वोच्च व्यासपीठ आहे. तेथे चर्चा व्हावी, प्रश्न विचारले जावेत, पुरावे मांडले जावेत आणि आवश्यक असेल तर निष्पक्ष चौकशीची मागणी केली जावी. पंतप्रधान आणि विरोधी पक्षनेते यांनी एकमेकांना आव्हाने देण्यापेक्षा देशातील ज्वलंत प्रश्नांवर संसदेत समोरासमोर चर्चा करण्याचे धाडस दाखवावे. देशाला राजकीय कुस्ती नको, तर प्रश्नांची उत्तरे हवी आहेत. आज सर्वसामान्य माणसाच्या मनात एकच प्रश्न आहे, या दोघांपैकी खरे कोण आणि खोटे कोण? दुर्दैवाने या प्रश्नाचे उत्तर देण्याऐवजी दोन्ही बाजूंकडून आरोपांच्या नव्या फैरी झाडल्या जात आहेत. पुरावे नसलेले गंभीर आरोप आणि उत्तरदायित्व नसलेले राजकारण लोकशाहीसाठी शुभसंकेत नाहीत. कारण लोकशाहीचा खरा आधार केवळ निवडणुका नसतात, तर जनतेचा विश्वास असतो. हाच विश्वास ढासळला तर सत्ताधारी आणि विरोधक दोघांचेही राजकीय नुकसान होईल; पण सर्वांत मोठे नुकसान भारतीय लोकशाहीचे होईल. त्यामुळे आरोपांची आतषबाजी थांबवा आणि पुराव्यांच्या आधारे सत्य जनतेसमोर मांडा, हीच आज देशातील नागरिकांची अपेक्षा आहे.

बालदिनः बालकांच्या स्वप्नांना पंख देण्याचा संकल्प!

बालकांच्या चेहऱ्यावरील हास्य म्हणजे राष्ट्राच्या भविष्याची आशा..!



भारताचे पहिले पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांचा जन्मदिन १४ नोव्हेंबर हा दिवस संपूर्ण देशात 'बालदिन' म्हणून साजरा केला जातो. नेहरूंना लहान मुलांविषयी विशेष प्रेम होते. मुले त्यांना प्रेमाने 'चाचा नेहरू' म्हणत. मुलांच्या निरागस हास्यात, त्यांच्या प्रश्नांत आणि स्वप्नांत त्यांना भारताचे उज्ज्वल भविष्य दिसत असे. म्हणूनच त्यांच्या जन्मदिनाचे औचित्य साधून बालकांच्या हक्कांची, शिक्षणाची, आरोग्याची आणि सर्वांगीण विकासाची जाणीव करून देणारा हा दिवस साजरा केला जातो.मात्र, बालदिन म्हणजे केवळ शाळांमध्ये भाषणे, सांस्कृतिक कार्यक्रम, खाऊवाटप आणि मनोरंजनाचा दिवस एवढाच त्याचा अर्थ मर्यादित राहू नये.बालकांच्या आयुष्याकडे आत्मपरीक्षणाच्या दृष्टीने पाहण्याचा हा दिवस आहे.

आजचे बालपण पूर्वीसारखे राहिलेले नाही.मोबाईल, इंटरनेट, सोशल मीडिया आणि डिजिटल मनोरंजनाच्या जगात बालकांचे बालपण हरवत चालले आहे. मैदानावरील खेळांची जागा मोबाईलच्या स्क्रीनने घेतली आहे.आजी-आजोबांच्या गोष्टींची जागा कार्टूनने, मित्रांच्या सहवासाची जागा आभासी मैत्रीने घेतली आहे.माहितीचा प्रचंड साठा उपलब्ध झाला असला तरी अनुभवातून शिकण्याची संधी कमी होत आहे. बुद्धिमत्ता वाढत असताना संवेदनशीलता, संयम आणि सामाजिक जाणीवही वाढते आहे का, हा खरा प्रश्न आहे.दुसरीकडे, समाजातील प्रत्येक बालकाला समान संधी मिळतेच असे नाही. ग्रामीण आणि दुर्गम भागातील अनेक मुले आजही गुणवत्तापूर्ण शिक्षण, पौष्टिक आहार, आरोग्यसेवा आणि सुरक्षित वातावरणापासून वंचित आहेत. काही बालकांच्या हातात दप्तराऐवजी कामाची साधने आहेत, तर काहींच्या वाट्याला शिक्षणाऐवजी बालमजुरी आणि कुपोषण आले आहे. आर्थिक विषमता, कौटुंबिक संघर्ष, व्यसनाधीनता आणि असुरक्षित सामाजिक वातावरण यांचा सर्वाधिक परिणाम बालमनावर होतो.

शिक्षणाच्या वाढत्या स्पर्धेत बालकांच्या नैसर्गिक कलागुणांकडे दुर्लक्ष होत आहे. प्रत्येक मुलाने डॉक्टर, इंजिनिअर किंवा अधिकारीच व्हावे, असा पालकांचा आग्रह असतो. मात्र, प्रत्येक मूल वेगळे असते. कुणामध्ये क्रीडागुण असतात, कुणामध्ये कलात्मकता, कुणामध्ये संशोधनवृत्ती, तर कुणामध्ये नेतृत्वक्षमता असते. मुलांची तुलना करण्यापेक्षा त्यांच्या क्षमतांना ओळखून प्रोत्साहन देणे हीच खरी पालकत्वाची कसोटी आहे. बालदिनाच्या निमित्ताने शिक्षकांची भूमिकाही महत्त्वाची ठरते. शाळा ही केवळ परीक्षेत गुण मिळविण्याची जागा नसून विचार, विवेक, वैज्ञानिक दृष्टिकोन, सर्जनशीलता आणि माणुसकी घडविणारे संस्कारकेंद्र असले पाहिजे.मुलांना प्रश्न विचारण्याचे स्वातंत्र्य, चुका करण्याची संधी आणि नव्या गोष्टी शोधण्याचे प्रोत्साहन मिळाले पाहिजे. शिक्षणातून केवळ हुशार विद्यार्थी नव्हे, तर जबाबदार नागरिक घडले पाहिजेत. आज बालकांना उपदेशापेक्षा संवादाची, बंधनांपेक्षा विश्वासाची आणि स्पर्धेपेक्षा प्रोत्साहनाची अधिक गरज आहे. पालकांनी मुलांसाठी वेळ द्यावा, त्यांचे म्हणणे ऐकून घ्यावे, त्यांच्या भावविश्वाचा आदर करावा.शिक्षकांनी प्रत्येक मुलातील सुप्त गुण ओळखावेत. शासनाने बालहक्क, गुणवत्तापूर्ण शिक्षण, कुपोषणमुक्त बालपण आणि सुरक्षित परिसर यांना प्राधान्य द्यावे.समाजानेही बालमजुरी, बालविवाह, बालशोषण आणि भेदभावाविरुद्ध जागरूक राहिले पाहिजे. पंडित जवाहरलाल नेहरू यांचे बालप्रेम केवळ स्मरणात ठेवून चालणार नाही, तर त्यांच्या बालकेंद्रित विचारांचा कृतीतून स्वीकार करणे आवश्यक आहे. प्रत्येक बालकाला आनंदी बालपण, दर्जेदार शिक्षण, अभिव्यक्तीचे स्वातंत्र्य आणि स्वप्नांना आकार देण्याची संधी मिळाली, तरच बालदिन साजरा करण्याला खरा अर्थ प्राप्त होईल. कारण, बालक ही केवळ कुटुंबाची संपत्ती नसून राष्ट्राची अनमोल ठेव आहे. आज आपण त्यांच्या हातात पुस्तक, मनात आत्मविश्वास आणि जीवनात माणुसकीचे मूल्य दिले, तर उद्याचा भारत अधिक समतावादी, सुसंस्कृत आणि समर्थ बनेल. बालदिन हा केवळ उत्सव न राहता प्रत्येक बालकाच्या चेहऱ्यावर आनंद फुलविण्याचा आणि त्याच्या स्वप्नांना पंख देण्याचा राष्ट्रीय संकल्प ठरावा, हीच खरी अपेक्षा!

पंडित पवळे
शिक्षणयोगी,नांदेड.

आदिवासींचा स्वाभिमान वीर बाबुराव शेडमाके



आदिवासी समाजासाठी अभिमान, आत्मसन्मान आणि हक्कांचे प्रतीक मानले जाणारे व्यक्तिमत्व म्हणजे वीर बाबूराव शेडमाके. १८५७ च्या स्वातंत्र्यलढ्यात इंग्रजांविरुद्ध बंड पुकारणारे गोंडवाना क्षेत्रातील (सध्याचा चंद्रपूर-गडचिरोली परिसर) एक महान आदिवासी स्वातंत्र्यसेनानी आणि क्रांतिकारक म्हणून त्यांची ओळख आहे. तत्कालीन परिस्थितीचा विचार करता इंग्रजाच्या अन्यायाने, त्यांच्या जुलूमशाहीने संपूर्ण भारतीय समाज त्रस्त झाला होता. अशा परिस्थितीमध्ये आदिवासी समाजही आपल्या हाल-अपेष्टा, गरीबी, दारिद्र्य या सगळ्या भस्मासुरामध्ये भरडला जात होता. शिवाय इंग्रजांच्या दबावाखाली अन्याय सहन करून जीवन व्यथित करत होता. इंग्रजांच्या विरुद्ध जाऊन बोलण्याची कोणीही हिम्मत करत नव्हते. मग त्यांच्या अन्यायाविरूद्ध आवाज उठवणे तर फार दूर होते. अशा परिस्थितीमध्ये आदिवासी समाजातून कोणी आवाज उठवणे म्हणजे हा एक चमत्कार किंवा दैवीरूप असलेला पुरुषच करेल अशी अवस्था होती. अशा परिस्थितीमध्ये वीर बाबुराव शेडमाके हे आदिवासींचे नेतृत्व करून आदिवासींवर होणाऱ्या अन्याय-अत्याचाराला वाचा फोडण्यासाठी पुढे आलेल एक नाव होत.

आदिवासी समाजामध्ये जन्मलेला वीर पुरुष पहिल्यांदा लोकांच्या समोर आला. इंग्रजांविरुद्ध लढण्यासाठी वीर बाबुरावजी शेडमाकेनी आपली वज्रमूठ आवळली. आपल्या जीवाची पर्वा न करता आदिवासीवरील होणारा अन्याय आपणच थांबवला पाहिजे. यासाठी त्यांनी प्रयत्न सुरू केले. तत्कालीन आदिवासी समाज रानावनात, डोंगरदऱ्यात, जंगलामध्ये राहून आपले जीवन व्यतीत करत होता. अशा समाजाला भयमुक्त करण्यासाठी, त्या समाजाच्या समस्या सोडवण्यासाठी आणि त्या समाजाला पुढे येऊन आपलं स्वतःचं अस्तित्व सिद्ध करण्यासाठी वीर बाबुराव शेडमाके या आदिवासीच्या लढवय्या महान योद्धाने आदिवासींमध्ये नवचैतन्य निर्माण करण्याचं महत्त्वाचं काम केलं.

वीर बाबूराव शेडमाके यांचा जन्म १२ मार्च १८३३ रोजी गडचिरोली जिल्ह्यातील किश्तपुर मोलमपल्ली या गावी झाला. वडिल पुल्लेसुर बापू आणि आई जुर्जाकुंवर यांच्या पोटी त्यांचा जन्म झाला. प्रतिकूल परिस्थिती असतांनाही त्यांनी रायपूर येथे आपले प्राथमिक शिक्षण पूर्ण केले. आणि जेव्हा इंग्रजाचा जुलूम वाढू लागला. तेव्हा आपले शिक्षण थांबवून परिस्थितीनरुप आदिवासींच्या पारंपारिक 'गोटूल' या प्रशिक्षण देणाऱ्या व्यवस्थेत प्रवेश घेतला. आणि तेथून मग युद्धकलेचे त्यात धनुष्यबाण, तलवारबाजी आणि गनिमी कावा याचे प्रशिक्षण घेतले. दिवसेंदिवस इंग्रजी शासन व्यवस्थेचा जुलूम वाढतच गेला. त्यात आदिवासी समाज पार भरडला जात होता.

इंग्रजांचे शोषण वाढतच चालले होते. त्यांच्या जुलूमशाहीने सगळा समाज त्रस्त झाला होता. भारतामध्ये संपूर्ण समाजामधून एक रोष व्यक्त होत होता. त्यात आदिवासी समाजावर चालवलेला अन्याय-अत्याचार आणि जुलूम हा तर अगदी पराकोटीला गेलेला होता. अशा परिस्थितीत आदिवासी समाजातून वीर बाबुराव शेडमाके यांच्या रूपाने उठावाची ठिणगी पेटली. आणि ती ठिणगी एक ज्वाला होऊन इंग्रजी सत्तेच्या विरूढ मोठा लढा उभा केला. जेव्हा १८५७ मध्ये संपूर्ण भारतामध्ये इंग्रजाविरुद्ध असंतोष निर्माण होवून, सगळीकडून उठाव निर्माण झाला. त्यावेळेस वीर बाबुराव शेडमाके हे २४ वर्षांचे तडफदार एक सळसळते रक्त होते. या जुलूमशाहीला मोडीत काढण्यासाठी त्यांनी विरोध करायला सुरवात केली. १८५७ मध्ये जेव्हा संपूर्ण देशात इंग्रजांविरुद्ध उठाव सुरू झाला. तेव्हा वीर बाबूराव शेडमाके यांनी चंद्रपूर (चांदागड) जिल्ह्यात आदिवासींना एकत्र केले. आदिवासी समाजातील तरुणांना एकत्र करून अन्यायाची जाणीव करून दिली. आणि त्यांना इंग्रजी जुलूमशाही विरूढ लढण्यासाठी तयार केले. त्यांनी २४ सप्टेंबर १८५७ रोजी 'जंगोम सेना' स्थापन केली. या जंगोम सेनेत तरुणांना सामील होण्यास प्रवृत्त केले. त्यांचे एकच ध्येय इंग्रजाचा बीमोड करणे. जंगोम सेनेत ५०० सैनिकांची तुकडी तयार करून त्यांना युद्धाचे प्रशिक्षण देवून तयार केले. या सेनेत केवळ आदिवासी युवकच नव्हते, तर रोहिले आणि इतर समाजाचे युवकही मोठ्या प्रमाणात सामील होते.

जंगोम सेनेच्या माध्यमातून वीर बाबुराव शेडमाके यांनी इंग्रजांविरुद्ध विविध लढाया करून त्यांना सळो की पळो केले. भारतीय समाजावर चालवलेला अन्याय दूर करण्यासाठी त्यांनी आपल्या जिवाची पर्वा कधीच केली नाही. त्यांनी इंग्रजांच्या ताब्यात असलेल्या राजगड किल्ल्यावर ७ मार्च १८५८ रोजी हल्ला केला. त्या लढाईत इंग्रज सैनिकांना पळवून तो किल्ला आपल्या ताब्यात घेतला. या घटनेनंतर इंग्रज कॅप्टन क्रिक्टन यांनी मोठ्या संख्येने इंग्रजी फौज पाठवली. पण त्या परिस्थितीला तोंड देण्यासाठी वीर बाबूराव शेडमाके तयारच होते. त्यांनी आपल्या जंगोम सेनेला लढण्यास प्रवृत्त केले. जंगोम सेनेनी त्यांच्या मार्गदर्शनाखाली चालून आलेल्या इंग्रज सैनिकांचा १३ मार्च १८५८ रोजी नांदगाव घोसरीच्या जंगलात पराभव केला. हा पराभव इंग्रजांचा नामोहरण करणारा ठरला. म्हणून इतर इंग्रज अधिकारी वेगवेगळ्या तुकड्याच्या माध्यमातून जंगोम सेनेला पराभूत करण्यासाठी आणि वीर बाबुराव शेडमाके यांना पकडून फाशीची शिक्षा करण्यासाठी सरसावले. वैनगंगा नदीच्या खोऱ्यात इंग्रज अधिकारी 'गार्टले' आणि 'हॉल' यांच्या तुकड्यांना चिमूर आणि घोट येथे जंगोम सेनेने गनिमी काव्याने सळो की पळो करून सोडले. वीर बाबुराव शेडमाके यांचा लढा केवळ राजकीय स्वातंत्र्यासाठी नव्हता. तो मागासलेल्या अत्याचाराच्या ओझ्याखाली झुकलेल्या आदिवासी सामाजाच्या अस्तित्वाचा लढा होता. इंग्रजांनी बनवलेल्या जुलमी जंगल कायद्यांमुळे आदिवासींचे जंगलातील अधिकार हिरावले जात होते. जंगोम सेनेने आदिवासींच्या 'जल-जंगल-जमीन' या नैसर्गिक हक्कांचे रक्षण करण्यासाठी उठवलेला लढा होता. इंग्रजांच्या जुलमी करावीरुद्ध उचललेला सामाजिक उठाव होता. समाजाचे आपण काहीतरी देणे लागतो. हा त्यांचा विचार आजच्या समाजात रुजणे गरजेचे आहे. समाजात त्यांच्या विचाराची पेरणी होणे गरजेचे आहे.

प्रत्येक वेळी वीर बाबुराव शेडमाके यांनी आणि त्यांच्या जंगोम सेनेपुढे इंग्रज सैनिक पराभूत होत होते. जंगोम सेनेची युद्धनीती ही जंगलात, नदीच्या परिसरात वेगवेगळ्या मार्गाने धूळ चारत होती. वीर बाबुराव यांना समोरासमोरील युद्धात पराभूत करणे इंग्रजांना अशक्य झाले होते. इंग्रजांनी शेवटी फितुरीचा मार्ग निवडला. पैशाला विकले जाणारे व्यक्ती शोधू लागले. त्याच उद्देशाने इंग्रज अधिकारी कॅप्टन क्रिक्टन याने त्यांच्यावर १,००० रुपयांचे बक्षीस ठेवले. अखेर अंतर्गत फितुरीतून त्यांचा घात झाला. अहेरीच्या तत्कालीन जमीनदार राणी लक्ष्मीबाई इंग्रजाच्या मोहाला बळी पडल्या. त्यांनी विश्वासघात करून फितुरीने १८ सप्टेंबर १८५८ रोजी वीर बाबूराव शेडमाके यांना भोपाळ पट्टणम येथून अटक करण्यात आली.

समाजाच्या हितासाठी अविरत लढा देणाऱ्या वीर महापुरुषास समाजातीलच लालची, फितूर लोकांकडूनच घात झाला. त्यांची चूक एकच झाली की, त्यांनी लोकांच्या समस्यासाठी लढताना लोकांवर उदार मनाने विश्वास ठेवला. त्यांच्या त्या अंध विश्वासाने लोकांकडूनच घात झाला. त्यांना साखळदंडात बांधून चंद्रपूरच्या तुरुंगात आणण्यात आले. भारतीय लोकांना एकजूट करून इंग्रजांविरुद्ध लढण्यास प्रवृत्त केल्याच्या आरोपावरून इंग्रजांच्या विशेष न्यायालयाने त्यांच्यावर राजद्रोहाचा खटला चालवला. त्यांना भीती निर्माण झाली होती की, वीर बाबुराव शेडमाके यांना आपण जर जीवंत सोडले तर लोक हळूहळू विद्रोह करायला लागतील. शेवटी आपली सत्ता पोकळ करून पूर्णपणे ढासळेल. हे जर थांबवायचे असेल तर त्यांना खुलेआम फाशी द्यावी लागेल. असे केल्याने लोक परत इंग्रज सत्तेविरुद्ध विद्रोहाची हिम्मत करणार नाहीत. अखेर २१ ऑक्टोबर १८५८ रोजी वयाच्या अवघ्या २५ व्या वर्षी चंद्रपूर जिल्हा कारागृहाच्या बाहेरील एका पिंपळाच्या झाडावर त्यांना फाशी देण्यात आली.

आदिवासी समाजातील धगधगती आग शमवण्यास अखेर इंग्रज सरकारला यश आले. वंचिताची हिम्मत, निराधारांचा आधार, शोषितांचा आवाज, जुलमी यांचा कर्दनकाळ, इंग्रजांना स्वप्नातही भयभीत करणारा त्यांचा काळ आणि अन्यायाच्या विरोधात धगधगणारी मशाल अखेर विझली. पण आजही क्रांतिवीर बाबूराव पुल्लेसुर शेडमाके यांच्या कार्याचा परधान आणि गोंड संस्कृतीशी जोडलेल्या लोकगीतांमध्ये उल्लेख अत्यंत आदराने केला जातो. त्यांच्या शौर्यामुळे आदिवासी समाजाने त्यांना 'वीर' ही पदवी दिली. भारत सरकारनेही त्यांच्या शौर्याची दाखल घेवून १२ मार्च २००९ रोजी वीर बाबूराव शेडमाके यांच्या स्मृतीप्रित्यर्थ एक विशेष टपाल तिकीट जारी केले. चंद्रपूर जिल्ह्याच्या तुरुंगासमोरील ज्या पिंपळाच्या झाडावर त्यांना फाशी दिली गेली. त्या ठिकाणी आजही पवित्र शहीद स्मारक म्हणून दरवर्षी १२ मार्च (जयंती) आणि २१ ऑक्टोबर (शहीद दिन) रोजी संपूर्ण आदिवासी बांधव एकत्र येऊन त्यांना आदरांजली वाहतात. परधान समाजातील लोकगीतांच्या माध्यमातून आजही वीर बाबूराव शेडमाके आणि जंगोम सेनेचा इतिहास पिढ्यानपिढ्या जिवंत ठेवला आहे.

डॉ.अशोक उईके
आदिवासी विकास मंत्री

सायंदैनिक नांदेड वार्ता
* संपर्क कार्यालय *
व्ही.डी.देशपांडे भवन, सोमेश कम्पाऊंड, मिलगेट जवळ, नांदेड-१
मुख्यसंपादक-प्रदीप नागापूरकर,भ्रमणध्वनी ९४२२१७४७७४,
सहसंपादक-अविनाश पाटील, भ्रमणध्वनी ९४२१९९०८८८
E-mail: nandedwarta@mail.com

तरोडा नाका ते मालेगाव रोडवर मृत्यूचा सापळा

शाळा,वस्ती असूनही गतिरोधक नाहीत; ज्येष्ठाच्या मृत्यूनंतर नागरिकांचा संताप

नांदेड/प्रतिनिधी-तरोडा नाका ते मालेगाव रोडवरील जिल्हा परिषद कॉलनी, उल्हासनगर, अनिकेत नगर हा भाग शहरातील सर्वात वर्दळीचा भाग बनला आहे. या ५०० मीटरच्या पट्ट्यात जिल्हा परिषद शाळा, लिटल स्कॉलर्स इंग्रजी माध्यम शाळा तसेच अन्य सेमी इंग्रजी शाळा आहेत. त्यामुळे सकाळी ७ ते दुपारी ५ वाजेपर्यंत शेकडो लहान बालके, पालक, महिला आणि वयोवृद्ध नागरिकांचा याच रस्त्यावर मोठा वावर असतो.

परंतु नवीन सी.सी. रोड झाल्यापासून या रस्त्याने वाहनांचा वेग प्रचंड वाढला आहे. विशेषतः सायंकाळच्या वेळी तरुणांची टोळकी बुलेट आणि स्पोर्ट्स बाईक जोरात चालवत जीवघेणी स्टंटबाजी करत असल्याच्या तक्रारी नागरिकांनी वारंवार केल्या आहेत. यापूर्वीही या रोडवर अनेक किरकोळ अपघात घडले आहेत. आणि अखेर काल घडू नये ते घडले. तारोडा खुर्द येथील ७० वर्षीय माणिक कल्याणकार यांचा भावसार चौकात भरधाव बुलेटच्या धडकेत मृत्यू झाला. एका निष्पाप वयोवृद्धाला आपला जीव गमवावा लागला. स्थानिक नागरिकांनी प्रशासनाला कळकळीची मागणी केली आहे की मालेगाव रोडवर प्रत्येक १०० मीटर अंतरावर शास्त्रोक्त पद्धतीने गतिरोधक बसवण्यात यावेत. शाळेच्या परिसरात 'शाळा पुढे आहे, हळू चला' चे फलक आणि झेब्रा क्रॉसिंग पेंटिंग करावे. भरधाव बाईक चालवणाऱ्या टोळक्यांवर पोलीस विभागाने सायंकाळी विशेष गस्त लावून कारवाई करावी. लहान बालके आणि वयोवृद्धांच्या सुरक्षिततेसाठी गतिरोधक बसवणे ही आता गरज नसून ती अत्यावश्यक बाब झाली आहे. आणखी एखादा बळी जाण्यापूर्वी महानगरपालिका आणि सार्वजनिक बांधकाम विभागाने तात्काळ याची दखल घ्यावी, अशी मागणी सर्व सामान्य नागरिकांमधून होत आहे.

बंजारा आरक्षणासाठी प्रयत्न करण्याची मागणी

मुखेड/प्रतिनिधी-चालू वर्षाच्या हिवाळी अधिवेशनामध्ये बंजारा समाजाला एस.टी. प्रवर्गातून आरक्षण लागू करावे, या मागणीसाठी तारांकित प्रश्न उपस्थित करावा, या करिता गोर सेनेच्या वतीने मुखेड-कंधार विधानसभा मतदारसंघाचे आ.डॉ. तुषार राठोड यांची त्यांच्या वसंत नगर येथील निवासस्थानी भेट घेऊन निवेदन देण्यात आले. सदर निवेदनाचा स्वीकार करताना आ. राठोड यांनी, हिवाळी अधिवेशनात हा प्रश्न आवर्जून उपस्थित करणार असल्याचे आश्वासन दिले.

कामनगाव येथे पाणी सप्ताहाचे आयोजन

पाण्यासाठी करण्यात येणार जागर

भोकर/प्रतिनिधी-पावसाच्या पाण्याचा थेंब ना थेंब अडविण्यासाठी, जिरविण्यासाठी ग्रामस्थांमध्ये जागृती व्हावी या येथूने सेवा समर्पण परिवार व कामनगाव ग्रामस्थांच्या वतीने १५ ते २२ नोव्हेंबर दरम्यान पाणी सप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे. या सप्ताहात पाण्यासाठी जागर करण्यात येणार आहे.

या सप्ताहाचे उद्घाटन १५ नोव्हेंबर रोजी विधान परिषदेचे सदस्य ना. हेमंत पाटील, मुख्य कार्यकारी अधिकारी महेश पाटील व प्रमुख अतिथी महंत उत्तम बन महाराज व मान्यवरांची उपस्थिती राहणार आहे.दैनंदिन कार्यक्रम सकाळी ७ ते १० श्रमदान जलसंधारणाची कामे, १२ वा. वृक्षारोपण व स्वच्छतेवर व्याख्यान, ३ ते ६ पुन्हा श्रमदान, रात्री ७.३० वा. कीर्तन होईल. व्याख्यान कार्यक्रमात वृक्षमित्र अण्णासाहेब जगताप, साखर आयुक्त श्रीकांत देशमुख, कथाकार राम तरटे, प्रा. धाराशिव हराळे, जलताराचे पुरुषोत्तम वायाळ, स्वच्छता दूत राष्ट्रसंत सद्गुरु साईनाथ महाराज वसमतकर यांचे व्याख्यान होईल व कीर्तन कार्यक्रमात ह.भ.प. लक्ष्मीकांत राहते, शिवाजी महाराज पावडे वाडीकर, मारुती महाराज नांदेकर, शिवाजी महाराज पिंपळगाव, डॉ. दिगंबर शिंदे, गजानन महाराज गायकवाड, दशरथ महाराज आंबोरे आदींचे कीर्तन होणार आहे परिसरातील ग्रामस्थांनी या कार्यक्रमाचा लाभ घेण्याचे आवाहन करण्यात आले आहे

नांदेडमध्ये १६ नोव्हेंबरला महिला लोकशाही दिनाचे आयोजन

नांदेड/प्रतिनिधी- शासन निर्णयानुसार राज्यातील सर्व जिल्ह्यांमध्ये दर महिन्याच्या तिसऱ्या सोमवारी महिला लोकशाही दिनाचे आयोजन करण्यात येते. या उपक्रमांतर्गत सोमवार १६ नोव्हेंबर रोजी सकाळी ११ वा. नांदेड येथे महिला लोकशाही दिन आयोजित करण्यात आला आहे. जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली हा कार्यक्रम महसूल प्रबोधिनी (प्रशिक्षण केंद्र), एसबीआय एटीएमच्या मागे, जिल्हाधिकारी कार्यालय परिसर नांदेड येथे पार पडणार आहे.

महिलांच्या विविध समस्या, अडचणी व तक्रारी जाणून घेऊन त्यांचे निराकरण करण्याच्या उद्देशाने या उपक्रमाचे आयोजन करण्यात येते. महिला लोकशाही दिनानिमित्त संबंधित समितीचे सदस्य तसेच शासन निर्णयात नमूद विभागांचे अधिकारी उपस्थित राहणार आहेत. जिल्ह्यातील समस्याग्रस्त व पीडित महिलांनी आपल्या तक्रारी व अर्ज विहित नमुन्यात सादर करून या संधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन महिला लोकशाही दिन समितीच्या अध्यक्ष तथा जिल्हाधिकारी नांदेड आणि सदस्य सचिव तथा जिल्हा महिला व बालविकास अधिकारी नांदेड यांनी केले आहे.

देगलूर महाविद्यालयातील तीन खेळाडूंची आंतरविद्यापीठीय व्हॉलीबॉल स्पर्धेसाठी निवड

देगलूर/प्रतिनिधी- स्वर्णिम स्पोर्ट्स युनिव्हर्सिटी, देसार (गुजरात) येथे दि. १६ ते १९ नोव्हेंबर दरम्यान आयोजित करण्यात येणाऱ्या पश्चिम विभागीय आंतरविद्यापीठीय व्हॉलीबॉल (महिला) स्पर्धेसाठी स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेडच्या महिला व्हॉलीबॉल संघात देगलूर महाविद्यालयातील तीन खेळाडूंची निवड झाली आहे. यामध्ये डाकोरे शिवानी, गुंडुरे वैष्णवी व डुबुकवाड अंबिका या खेळाडूंचा समावेश आहे.

देगलूर/प्रतिनिधी-या स्पर्धेच्या पूर्वतयारीसाठी विद्यापीठाच्या महिला व्हॉलीबॉल संघाचे प्रशिक्षण शिबिर दि. १ ते १३ नोव्हेंबर या कालावधीत स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड येथे आयोजित करण्यात आले होते. या प्रशिक्षण शिबिरात खेळाडूंना विद्यापीठाचे प्रशिक्षक डॉ. निरज उपलंचवार यांनी मार्गदर्शन केले. तसेच निवड झालेल्या खेळाडूंना महाविद्यालयातील क्रीडा मार्गदर्शक प्रा. दीपक वावधाने व प्रा. सिताराम हाके यांचे मार्गदर्शन लाभले. या खेळाडूंनी मिळविलेल्या यशाबद्दल अडत व्यापारी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष प्रकाश पाटील बेम्बरेकर, उपाध्यक्ष जनार्दन चिद्रावार, सचिव डॉ. कर्मवीर उनग्रतवार, सहसचिव राजकुमार महाजन, कोषाध्यक्ष विलास तोटावार तसेच संस्थेच्या कार्यकारिणी मंडळातील सदस्य देवेंद्र मोतेवार, सूर्यकांत नारलावार, गंगाधरराव जोशी, रविंद्र अप्पा द्याडे, चंद्रकांत नारलावार, गुरुराज चिद्रावार, विजय उनग्रतवार व सुभाषराव सांगवीकर यांनी खेळाडूंचे अभिनंदन केले. तसेच महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. मोहन खताळ, उपप्राचार्य डॉ. अनिल चिद्रावार, उपप्राचार्य प्रा. चमकुडे एम. एम., उपप्राचार्य डॉ. शेरिकर व्ही. जी., पर्यवेक्षक श्री. संग्राम



पाटील, कार्यालय अधीक्षक गोविंद जोशी यांच्यासह महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थ्यांनी खेळाडूंचे अभिनंदन करून आगामी स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या. देगलूर महाविद्यालयाच्या या तीन खेळाडूंच्या निवडीमुळे महाविद्यालयाच्या क्रीडा क्षेत्रातील यशात आणखी एक मानाचा तुरा रोवला गेला आहे.

श्रीक्षेत्र पशुपतिनाथ महायात्रा धर्मजागरण महोत्सवाचे आयोजन

मुखेड/प्रतिनिधी- दरम्यान या धार्मिक आध्यात्मिक संस्कार, धार्मिक परंपरा आणि धर्मजागृतीचा संदेश समाजापर्यंत पोहोचविण्याच्या उद्देशाने श्री. श्री. प. पू. सद्गुरु श्री नराशाम महाराज यांच्या सानिध्यात श्रीक्षेत्र पशुपतिनाथ महायात्रा धर्मजागरण महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. येवती (लघु आळंदी), ता. मुखेड, जि. नांदेड येथील मठ संस्थान आणि सद्गुरू सेवा समिती यांच्या वतीने दि.२३ मे २०२७ ते ०४ जुन २०२७ महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे.

सदगुरु श्री नराशाम महाराज यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित या महोत्सवाचा मुख्य उद्देश समाजामध्ये धार्मिक श्रद्धा, भक्तिभाव, संस्कार आणि आध्यात्मिक विचारांची रुजवण करणे हा आहे. संत-महात्म्यांच्या विचारांचा प्रसार, धार्मिक परंपरांचे जतन आणि नव्या पिढीला भारतीय संस्कृतीची ओळख करून देण्यावर या महोत्सवात विशेष भर देण्यात आला आहे. सद्गुरूंचे मार्गदर्शन हे जीवनाला योग्य दिशा देणारे असून त्यांच्या सानिध्यातून भक्तांना आत्मिक समाधान, सकारात्मक विचार आणि आध्यात्मिक प्रेरणा मिळते. भक्ती, सेवा, संस्कार, सदाचार आणि परस्पर सहकार्य या मूल्यांचा प्रसार करण्यासाठी अशा धार्मिक उपक्रमांचे महत्त्व अनन्यसाधारण असल्याचे आयोजकांनी नमूद केले आहे.

या महोत्सवाचे प्रमुख आकर्षण म्हणजे श्रीक्षेत्र पशुपतिनाथ महायात्रा होय. या यात्रेच्या माध्यमातून भाविकांना धार्मिक स्थळांचे दर्शन, संतसंगती आणि आध्यात्मिक अनुभूती घेण्याची संधी उपलब्ध करून देण्यात आली आहे. यात्रेसाठी विविध प्रवास व निवास व्यवस्था उपलब्ध करून देण्यात आली आहे. एसी टू-टायर, एसी थ्री-टायर आणि स्लीपर अशा विविध प्रवास सुविधांचे नियोजन करण्यात आले आहे. धर्म, भक्ती आणि संस्कारांचा संगम असलेल्या या महोत्सवात सर्व धर्माभिमानी, सद्गुरूभक्त आणि शिवभक्तांनी सहभागी होऊन धार्मिक महोत्सवाची शोभा वाढवावी, असे आवाहन श्री. श्री. प. पू. सद्गुरु श्री नराशाम महाराज तसेच सद्गुरू सेवा समिती, येवती संस्थान यांच्या वतीने बाळू महाराज जोशी येवतीकर (९८२३२०९२०५) व राजू पाटील मोकासदरा (९४०४६६२८८८) करण्यात आले आहे.

पान १ वरुन

आजीबाईंच्या...

पोलीस स्टेशनमध्ये बोलावून घेतले. पोलिसांच्या उपस्थितीत शेख याकूब यांच्या हस्ते ही बॅग त्यांना सुखरूप परत करण्यात आली. आपला दीड लाखांचा मौल्यवान ऐवज परत मिळाल्याने आजीबाई सह त्यांचे नातेवाईक भावूक झाले होते. त्यांनी शेख याकूब यांना मनापासून आशीर्वाद देत त्यांचे आभार मानले. देगलूर पोलीस प्रशासनानेही शेख याकूब यांच्या प्रामाणिकपणाची दखल घेत त्यांचा सत्कार केला असून, समाजमाध्यमांवरही त्यांच्यावर कौतुकाचा वर्षाव होत आहे.

विभागीय भ्रष्टाचार निर्मूलन समितीची बैठक १७ नोव्हेंबरला

छत्रपती संभाजीनगर- भ्रष्टाचाराचे निर्मूलन करण्यासाठी शासन प्रयत्नशील आहे. या पार्श्वभूमीवर शासकीय कर्मचाऱ्यांविरुद्ध प्राप्त होणाऱ्या भ्रष्टाचारासंबंधी तक्रारींचा आढावा घेण्यासाठी विभागीय भ्रष्टाचार निर्मूलन समितीची बैठक मंगळवार, दि.१७ नोव्हेंबर रोजी दुपारी १२ वाजता विभागीय आयुक्त कार्यालयात आयोजित करण्यात आली आहे. ही बैठक विभागीय आयुक्त जी. श्रीकांत यांच्या अध्यक्षतेखाली होणार आहे.

या बैठकीत विभागातील भ्रष्टाचार निर्मूलनासंदर्भातील विविध विषयांवर चर्चा करण्यात येणार आहे. संबंधित विभागांच्या अधिकाऱ्यांनी बैठकीस उपस्थित राहावे, असे आवाहन लाचलुचपत प्रतिबंधक विभागाचे अपर पोलीस अधीक्षक तथा विभागीय भ्रष्टाचार निर्मूलन समितीचे सदस्य शशीकांत सिंगारे यांनी केले आहे.

पीरबुऱ्हाननगरात कब्रस्तानसाठी जागा द्या

अनवर अहमद यांचे प्रशासनाला निवेदन

नांदेड/प्रतिनिधी-असदुलाबाद येथील हजरत पीर बुरहाननगर, सर्व्हे क्रमांक ६० मधील विमानतळाच्या संरक्षक भिंतीलगत, शोभानगरसमोरील महानगरपालिकेच्या मालकीची सुमारे २ ते २.५ एकर मोकळी जागा मुस्लिम समाजाच्या कब्रस्तानासाठी उपलब्ध करून द्यावी, अशी मागणी शिवसेना अल्पसंख्याक विभागाचे जिल्हाप्रमुख अनवर अहमद यांनी केली आहे.

उत्तर नांदेडमधील वाढत्या मुस्लिम लोकसंख्येच्या तुलनेत कब्रस्तानांची जागा अपुरी पडत असल्याने नागरिकांना दफनविधीसाठी अडचणींचा सामना करावा लागत आहे. ही समस्या लक्षात घेता नई आबादी येथील कब्रस्तान पूर्णपणे भरले असून, असरा नगर परिसरातील कब्रस्तानची जागाही अपुरी पडत आहे. उत्तर नांदेडमधील वाढती लोकसंख्या आणि नव्याने विकसित होत असलेल्या वस्त्यांमुळे भविष्यात ही समस्या अधिक गंभीर होण्याची शक्यता आहे. प्रस्तावित जागेची मालकी, आरक्षण आणि विमानतळ प्राधिकरणाचे सुरक्षा निर्बंध यांची तपासणी करून नियमानुसार जागा कब्रस्तानासाठी उपलब्ध करून द्यावी, अशी मागणी निवेदनातून करण्यात आली आहे. शिवसेना अल्पसंख्याक विभागाचे जिल्हाप्रमुख अनवर अहमद, जिल्हा सचिव शेख फरीद आणि शहरप्रमुख शेख फारुख यांनी हे निवेदन सादर केले. प्रशासनाने या मागणीचा सहानुभूतीपूर्वक विचार करून मुस्लिम समाजासाठी कब्रस्तानाची जागा उपलब्ध करून द्यावी, अशी मागणी करण्यात आली आहे.

नांदेड जिल्ह्यात ३०० ज्येष्ठ साहित्यिक व कलावंतांची निवड

नांदेड/प्रतिनिधी- ज्येष्ठ साहित्यिक आणि कलावंतांच्या कलासेवेचा सन्मान करण्यासाठी राबविण्यात येणाऱ्या राजर्षी शाहू महाराज ज्येष्ठ साहित्यिक व कलावंत मानधन सन्मान योजने अंतर्गत नांदेड जिल्ह्यातील एकूण ३०० कलावंतांची निवड करण्यात आली आहे. या निवड यादीला अंतिम मंजुरी मिळण्याची प्रक्रिया सुरू असून, पहिल्या टप्प्यात १८४ लाभार्थ्यांना पीपीओ क्रमांक प्राप्त झाल्याने त्यांचे मानधनही सुरू झाले आहे. उर्वरित लाभार्थ्यांच्या मंजुरीसाठीची कार्यवाही प्रगतिपथावर आहे.

जिल्हा परिषदेच्या ग्रामपंचायत विभागामार्फत या योजनेची प्रक्रिया राबविण्यात येते. सन २०२३-२४, २०२४-२५ आणि २०२५-२६ या तीन वर्षांतील प्रलंबित अर्जांच्या निवडीसाठी जिल्हास्तरीय निवड समिती गठित करून प्रक्रिया राबविण्यात आली. सुरुवातीला सन २०२३-२४ मधील ३१६, सन २०२४-२५ मधील १ हजार ९६ आणि सन २०२५-२६ मधील ५१५ अर्ज छाननीअंती पात्र ठरले होते. जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली ४ ते ८ मे या कालावधीत पात्र कलावंतांच्या प्रत्यक्ष कला सादरीकरणाचे आयोजन करण्यात आले. यामध्ये २०२३-२४ मधील २४९, २०२४-२५ मधील ८५७ आणि २०२५-२६ मधील ४१५ कलावंतांनी आपली कला सादर केली. त्यानंतर कलावंतांचे वय, विधवा अथवा निराधार स्थिती, दिव्यांगत्व, प्राप्त पुरस्कार, कलाक्षेत्रातील सेवा कालावधी आणि प्रत्यक्ष कला सादरीकरण यासाठी निर्धारित गुणांच्या आधारे गुणानुक्रम तयार करण्यात आला. एकूण ३५ गुणांच्या निकषांनुसार प्रत्येक वर्षासाठी १०० याप्रमाणे ३०० कलावंतांची निवड करून त्यांची यादी अंतिम मंजुरीसाठी पर्यटन व सांस्कृतिक कार्य संचालनालय, मुंबई येथे पाठविण्यात आली. सध्या निवड झालेल्या ३०० कलावंतांपैकी १८४ जणांना पीपीओ क्रमांक मिळून मानधन सुरू झाले आहे. उर्वरित ११६ लाभार्थ्यांपैकी १६ जणांची तांत्रिक पडताळणी, केवायसी आणि पीपीओ क्रमांक निर्गमनाची प्रक्रिया सुरू आहे, तर सन २०२५-२६ मधील १०० लाभार्थ्यांच्या अंतिम मंजुरीचे आदेश अद्याप प्राप्त होणे बाकी आहेत. दरम्यान, जिल्हास्तरीय समितीच्या ४ नोव्हेंबर रोजी झालेल्या बैठकीतील निर्णयानुसार, निवड झालेल्या सर्व ३०० लाभार्थ्यांची एकत्रित यादी सोशल मीडिया तसेच जिल्हा परिषदेच्या अधिकृत संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आली आहे. ही संपूर्ण निवड प्रक्रिया पारदर्शक पद्धतीने राबविण्यात आली असून, ज्येष्ठ साहित्यिक व कलावंतांनी कोणत्याही आमिषाला किंवा दिशाभूल करणाऱ्या माहितीला बळी पडू नये. मानधन मंजूर करून देण्याच्या नावाखाली कोणी पैशांची मागणी अथवा आमिष दाखविल्यास संबंधितांनी तातडीने जिल्हाधिकारी कार्यालय किंवा जिल्हा परिषदेच्या पंचायत विभागाशी संपर्क साधावा, असे आवाहन प्रशासनाच्या वतीने करण्यात आले आहे.

मन्नेरवारलू समाजबांधवांनी क्रांतीसूर्य बिरसा मुंडा जयंती साधेपणाने साजरी करावी-दत्तात्रय अन्नमवाड

नांदेड/प्रतिनिधी- दि.१५ नोव्हेंबर ते १५ डिसेंबर एक महिना संपूर्ण देशभरात क्रांतीसूर्य बिरसा मुंडा जयंती साजरी केली जाते. जयंतीच्या निमित्ताने सामाजिक प्रबोधनाचे विविध कार्यक्रम आयोजित करावेत. विविध आरोग्यदायी शिबीरं, मेळावे व सामाजिक बंधूभाव, एकोपा वाढवणारे, प्रबोधनात्मक उपक्रम, कार्यक्रम आयोजित करावेत. आदिवासी समाज हा जल, जंगल, जमिनीचा रक्षक व पूजक आहे. बिरसा मुंडाच्या नावाने समाजाने गावागावांत वड, पिंपळ, चिंच, लिंब असे पर्यावरणपूरक उपयोगी वृक्षारोपण करावे. कोरडा दुष्काळ पडल्याने शेतकरी, शेतमजूर, कष्टकरी यांच्यासह सर्व समाज घटक चिंतीत व हैराण आहेत. त्यामुळे कोणताही जास्तीचा अवास्तव खर्च न करता साधेपणाने सर्व कार्यक्रम पार पाडावे, असे आवाहन मन्नेरवारलू समाज सुधारक मंडळाचे अध्यक्ष दत्तात्रय अन्नमवाड यांनी केले.

तसेच वक्तृत्व स्पर्धा, व्याख्याने, साहित्य संमेलने, मेळावे, क्रीडास्पर्धा आयोजित करून आदिवासीं द्राविडियन संस्कृती, रुढी, परंपरा, चालीरीती यांची नवीन पिढीला माहिती करून द्यावी. विद्यार्थी, शेतकरी, व्यापारी, उद्योजक, कर्मचारी, अधिकारी, सर्व सेवानिवृत्त, विविध क्षेत्रांतील सर्व स्त्री-पुरुषांनी हा जयंती उत्सव महिना बिरसा मुंडा यांच्या विचाराने साजरा करावा, असे आवाहन समस्त आदिवासी व बहुजन समाजाला मन्नेरवारलू समाज सुधारक मंडळाच्या वतीने अध्यक्ष दत्तात्रय अन्नमवाड, उपाध्यक्ष/कायदेशीर सल्लागार ॲड. सुधीर राऊतवाड, कोषाध्यक्ष मोहनराव गोपूलवाड, अतुल पेदेवाड, सुभाषराव कालेवाड, सल्लागार मारोतराव देगलूरकर, व्यंकटराव सूरेवाड, शंकरराव चांडोळकर, सोपानराव मारकवाड, नामदेवराव मिठेवाड, माणिकराव पेरके, नरहरी पल्लेवाड, देवराव टिपरसे, दिलीप बोधगिरे, माधव अडबलवाड, संभाजीराव काष्टेवाड, बालाजीराव इंगेवाड, रामचंद्र मारकवाड, लक्ष्मणराव चटलावार, विजय ऊनग्रतवार, बळीराम कोणेरी, शिवराम बोधगिरे, रामचंद्र मुसळे, प्रवीण जेठेवाड, रावसाहेब पुपलवाड, श्याम बास्टेवाड, अजय बंदेल, माधव लखमोड, मारोतराव गुरलेवाड, सुनील टिपरसे व सर्व सक्रीय सभासद, कार्यकर्ते, समाजबांधवांनी आवाहन केले आहे.

वाकोडीकर अपघातातील ऑटो चालकाचा शोध घ्या

जिल्हा व किनवट पत्रकार संघाची मागणी

किनवट/प्रतिनिधी- पत्रकार प्रदीप वाकोडीकर यांच्या अपघाती मृत्यू प्रकरणी किनवट पोलीसात गुन्ह्याची नोंद करण्यात आली असून पुढील तपासाला सुरुवात झाली आहे. ९ नोव्हेंबर रोजी किनवट शहरातील सुंदर हॉस्पिटल समोर हा अपघात घडला. या प्रकरणातील अज्ञात ऑटोरिक्षा चालकाला शोधून काढणे किनवट पोलीसांसमोर आव्हान ठरले आहे. स्थानिक पत्रकारांच्या शिष्टमंडळासह जिल्हा पत्रकार संघानेही गंभीर दखल घेत पोलीस निरीक्षक जगदीश मंडलवारांची भेट घेतलीय.

पोलिसांकडे नोंदवलेल्या फिर्यादीनुसार, पत्रकार वाकोडीकर हे ९ नोव्हेंबर रोजी सकाळी घराकडून क्रमांक एम.एच. २६, सी.यु. ४६३४ या स्कुटीने त्यांच्या किनवट ते गोकुंदा जाणाऱ्या रोडवरील सुंदर हॉस्पिटल जवळील कार्यालयात जाताना पाठीमागून भरधाव वेगाने रेतीची वाहतूक करणाऱ्या एका पिवळ्या ट्राली ऑटोरिक्षाने त्यांच्या स्कूटीला जोरदार धडक दिली, आजही किनवट पोलीस ठाण्यात लाऊन असलेल्या त्या स्कुटीवरील खरचटलेली पिवळ्या रंगाची निशानी साक्ष देते. पोलीस तपासातून काय निष्पन्न होणार याकडे आता सर्वांचेच लक्ष लागून दिसते. सुरुवातीला कुटुंबाने दुःखाच्या भरात मृतदेहाचे शवविच्छेदन नको असल्याचे लेखी दिले होते. मात्र, त्यानंतर सारंग वाकोडीकर यांनी दिलेल्या फिर्यादीवरून किनवट पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहिता (बीएनएस), २०२३ च्या कलम १०६ (१), २८१ आणि १२५ (ब) नुसार अज्ञात पिवळ्या ट्राली ऑटोरिक्षा चालकाविरुद्ध गुन्हा (एफआयआर नं.०३३३/२०२६) नोंदवण्यात आला असून, पोलीस पुढील तपास चालू असल्याचे सूत्रांनी सांगितले. मृतदेहाची उत्तरीय तपासणी प्रक्रिया रिपोर्ट उपलब्ध नसल्याचा मुद्दा पोलीस निरीक्षकांनी पत्रकारांच्या शिष्टमंडळासमोर उपस्थित केला होता. अवैध रेती वाहतूक करणाऱ्या वाहनांवर आणि तेलंगणा राज्याच्या पासींगच्या पिवळ्या ऑटोरिक्षांवर कारवाई करण्याचा मुद्दा पत्रकारांनी पोलीस निरीक्षकांसह आरटीओंकडे लाऊन धरला. दरम्यान पोलीस निरीक्षकांनी कारवाई करण्याविषयी अनास्था दाखवली असली तरी आरटीओंनी सकारात्मक प्रतिसाद देत कारवाई करण्याचे आश्वासन दिले, हे विशेष. पोलीस तपासातून लवकर छडा न लागल्यास पत्रकारांनी आंदोलनाची भूमिका स्पष्ट केली आहे.

शेतकऱ्यांनी पीक विमा योजनेत सहभागी व्हावे-विशाल बिऱ्हाडे

नांदेड/प्रतिनिधी- राज्य शासनाने रब्बी हंगाम २०२६-२७ साठी अधिसूचित क्षेत्रातील अधिसूचित पिकांसाठी सुधारित प्रधानमंत्री पीक विमा योजना राबविण्याचा निर्णय घेतला आहे. यावर्षी एल निनोच्या प्रभावामुळे निर्माण झालेली दुष्काळसदृश परिस्थिती लक्षात घेता शेतकऱ्यांनी या योजनेत मोठ्या प्रमाणात सहभाग नोंदविणे आवश्यक आहे. नुकसानी पासून शेतकऱ्यांचे आर्थिक संरक्षण व्हावे, यासाठी प्रधानमंत्री पीक विमा योजनेत जास्तीत जास्त शेतकऱ्यांनी सहभागी व्हावे, असे आवाहन अर्धापूरचे तालुका कृषी अधिकारी विशाल बिऱ्हाडे यांनी केले आहे. या हंगामात गहू (बागायत), रब्बी ज्वारी (बागायत व जिरायत), हरभरा, रब्बी मका, उन्हाळी भात, उन्हाळी भुईमूग व रब्बी कांदा या सात पिकांचा समावेश करण्यात आला आहे. अधिसूचित महसूल मंडळ व क्षेत्रातील शेतकऱ्यांना या योजनेत सहभागी होता येणार आहे.

योजनेत सहभागी होण्यासाठी पीकनिहाय अंतिम मुदती निश्चित करण्यात आल्या आहेत. रब्बी ज्वारी (बागायत व जिरायत) पिकासाठी ३० नोव्हेंबर, तर गहू (बागायत), हरभरा, रब्बी मका व रब्बी कांदा या पिकांसाठी १५ डिसेंबर ही अंतिम मुदत आहे. तसेच उन्हाळी भात व उन्हाळी भुईमूग पिकांसाठी ३१ मार्च २०२७ पर्यंत विमा नोंदणी करता येणार आहे. कर्जदार शेतकऱ्यांनी योजनेत सहभागी होण्यासाठी विहित नमुन्यातील अर्ज संबंधित बँकेमार्फत मुदतीत सादर करणे आवश्यक आहे. योजनेत सहभागी व्हायचे नसल्यास अंतिम मुदतीच्या सात दिवस आधी संबंधित बँकेस लेखी कळविणे आवश्यक आहे. शेतकऱ्यांना प्रधानमंत्री पीक विमा योजनेच्या संकेतस्थळावर स्वतः नोंदणी करता येईल. तसेच संबंधित बँका, विमा कंपनीचे नियुक्त प्रतिनिधी, क्रॉप इन्शुरन्स प आणि सामूहिक सेवा केंद्र यांच्या माध्यमातूनही नोंदणीची सुविधा उपलब्ध आहे. भाडेपट्ट्याने किंवा बटाईने शेती करणाऱ्या शेतकऱ्यांनाही योजनेत सहभागी होता येणार आहे. अधिक माहितीसाठी शेतकऱ्यांनी संबंधित पीक विमा कंपनीचे कार्यालय, तहसीलदार कार्यालय, तालुका कृषी अधिकारी कार्यालय, जिल्हाधिकारी कार्यालय किंवा जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी कार्यालयाशी संपर्क साधावा. नांदेड जिल्ह्यासाठी नियुक्त विमा कंपनी इफ्को टोकियो जनरल इन्शुरन्स कंपनी लिमिटेड ९ वा मजला ऑफिस ए, नेक्सस वेस्टेंड सेक्टर १ बिल्डिंग ए सर्वे क्र १६९/१ परिहार चौकाजवळ डीपी रोड औंध पुणे ४११००७ असून अधिक माहितीसाठी ई-मेलवर संपर्क साधता येईल. रब्बी हंगामातील पिकांचे संभाव्य नैसर्गिक आपत्तीमुळे होणारे नुकसान टाळण्यासाठी शेतकऱ्यांनी निर्धारित मुदतीपूर्वी पीक विमा नोंदणी करून योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन तालुका कृषी अधिकारी विशाल वसंतराव विंगाडे यांनी केले आहे.

केरळ पोलिसांकडून २७ वर्षीय तरुणाला अटक

बॉलिवूड कलाकारांवर बिश्नोई गँगची पाळत!

मुंबई/प्रतिनिधी- बॉलिवूड मधील प्रसिद्ध कलाकारांच्या हालचालींवर लक्ष ठेवून त्यांची गोपनीय माहिती थेट परदेशात असलेल्या लॉरेन्स बिश्नोई टोळीपर्यंत पोहोचविण्याचे धक्कादायक प्रकरण उघडकीस आले आहे. मुंबईत छायाचित्रकार म्हणून काम करणाऱ्या २७ वर्षीय तरुणाने कलाकारांचे छायाचित्रण करण्याच्या आड त्यांच्या येण्या-जाण्यावर पाळत ठेवून महत्त्वाची माहिती टोळीच्या सदस्यांपर्यंत पोहोचविल्याचा संशय पोलिसांनी व्यक्त केला आहे. या कामाच्या मोबदल्यात संबंधित तरुणाच्या पत्नीच्या बँक खात्यात पैसे जमा करण्यात आल्याची माहितीही तपासात पुढे आली आहे. या प्रकरणी केरळ पोलिसांनी गुरुमूर्ती नामक तरुणाला अटक केली असून, त्याच्या अटकेमुळे बिश्नोई टोळीच्या देशांतर्गत आणि परदेशातील संपर्काचे जाळे उघड होण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

पोलिसांच्या माहितीनुसार, गुरुमूर्ती हा मूळचा तामिळनाडूचा रहिवासी असून, काही काळ तो नवी मुंबई आणि कांदिवली पश्चिम परिसरात वास्तव्यास होता. मुंबईत असताना त्याने छायाचित्रकार म्हणून काम केले. याच कामाच्या माध्यमातून त्याला चित्रपटसृष्टीतील कलाकारांच्या संपर्कात येण्याची संधी मिळाली. कलाकारांचे छायाचित्र काढण्यासोबतच ते कुठे जातात, कोणाला भेटतात, त्यांचे दैनंदिन वेळापत्रक काय असते आणि त्यांच्या हालचाली कशा असतात, याची माहिती तो गोळा करीत असल्याचा संशय आहे. ही माहिती आणि छायाचित्रे परदेशात असलेल्या बिश्नोई टोळीच्या सदस्यांपर्यंत पोहोचविली जात असल्याचे तपासात समोर आले आहे.

क्रांतिगुरु लहुजी साळवे जयंतीनिमित्त अभिवादन कार्यक्रम संपन्न



नांदेड/प्रतिनिधी-आद्य क्रांतिगुरू लहुजी वस्ताद साळवे यांच्या जयंतीनिमित्त आज शनिवार, दि.१४ नोव्हेंबर रोजी सकाळी ९.३० वाजता नांदेड येथील साहित्यरत्न लोकशाहीर डॉ. अण्णाभाऊ साठे यांच्या पूर्णाकृती पुतळा परिसर, साठे चौक येथे सकल मातंग समाजाच्या वतीने अभिवादन कार्यक्रम उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला.

यावेळी क्रांतिगुरू लहुजी वस्ताद साळवे यांच्या प्रतिमेस व पुतळ्यास अभिवादन करून त्यांच्या महान कार्याचे, त्यागाचे आणि देशाच्या स्वातंत्र्यलढ्यातील योगदानाचे स्मरण करण्यात आले. लहुजी वस्ताद साळवे यांनी परकीय सत्तेविरुद्ध संघर्ष करण्यासाठी युवकांमध्ये शौर्य, धैर्य आणि राष्ट्रभक्तीची भावना निर्माण केली. त्यांनी सामाजिक विषमतेविरुद्ध जनजागृती करत वंचित आणि उपेक्षित समाजघटकांमध्ये स्वाभिमानाची जाणीव निर्माण केली. त्यांच्या कार्यातून सामाजिक एकजूट, संघटनशक्ती आणि परिवर्तनाची प्रेरणा मिळते. आजच्या काळात लहुजी वस्ताद साळवे यांचे विचार केवळ जयंतीपुरते मर्यादित न ठेवता शिक्षण, सामाजिक संघटन, समाजातील वंचित घटकांचे सक्षमीकरण आणि सामाजिक न्यायाच्या चळवळीतून पुढे नेण्याची आवश्यकता आहे. त्यांच्या संघर्षमय जीवनाचा आदर्श नव्या पिढीने स्वीकारावा, असे आवाहन यावेळी करण्यात आले. या अभिवादन कार्यक्रमास सकल मातंग समाजाचे राज्य समन्वयक ॲड. गणेश तादलापूरकर, माजी पंचायत समिती सदस्य नामदेव कांबळे, भाजपा अनुसूचित जाती मोर्चाचे सरचिटणीस संजय गोटमुखे, आरक्षणाचे अभ्यासक केशव शेकापूरकर, लसाकमचे माजी जिल्हाध्यक्ष भारत कलवले, उमाजी रेड्डी, पत्रकार किशोरकुमार वागदरीकर, राजू गायकवाड, प्रेमानंद शिंदे, सुनील देटवे, सोनू वाघमारे, राणी पद्मावती बंडेवार, विशाखा बंडेवार, काशिनाथ कांबळे, प्रथमेश तादलापूरकर, सुनील गवळी, बालाजी भालेराव आदी मान्यवर व समाजबांधव उपस्थित होते.

डॉ.गंगाधर कल्याणकर यांची वैद्यकीय अधिकारीपदी नियुक्ती



आसना मॉर्निंग वॉक ग्रुपतर्फे सत्कार

नांदेड/प्रतिनिधी-तरोडा बुद्रुक येथील ज्येष्ठ नागरिक तथा आसना मॉर्निंग वॉक ग्रुपचे सदस्य विश्वनाथराव कल्याणकर यांचे चिरंजीव डॉ. गंगाधर कल्याणकर यांची रायगड जिल्ह्यातील नागोठणे प्राथमिक आरोग्य केंद्रात वैद्यकीय अधिकारी म्हणून शासकीय सेवेत नियुक्ती झाली आहे. त्यांच्या या यशाबद्दल आसना मॉर्निंग वॉक ग्रुपचे अध्यक्ष आनंदराव कल्याणकर यांच्या हस्ते त्यांचा सत्कार करण्यात आला.

डॉ. गंगाधर यांच्या रूपाने तरोडा बुद्रुक गावाच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा रोवला गेला आहे. गावातून वैद्यकीय क्षेत्रात यश संपादन करणारे ते पाचवे डॉक्टर ठरले आहेत. यापूर्वी गावातील डॉ. गजानन नामदेवराव देशमुख, डॉ. वैशाली विजयराव देशमुख, डॉ. वृशांक गजानन देशमुख आणि डॉ. वृषू गजानन देशमुख यांनी वैद्यकीय क्षेत्रात आपली ओळख निर्माण केली आहे. आता डॉ. गंगाधर विश्वनाथराव कल्याणकर यांच्या यशामुळे गावाच्या शैक्षणिक आणि वैद्यकीय परंपरेत आणखी एक भर पडली आहे. त्यांच्या या यशामुळे गाववासीयांमध्ये आनंदाचे वातावरण आहे. ॲड. शिवाजीराव वडजे यांच्या कार्यालयात आयोजित करण्यात आलेल्या या सत्कार समारंभास दिलीपराव रावसाहेब देशमुख, ॲड. शिवाजीराव वडजे, अंकुशराव डोंगरे, विश्वनाथराव कल्याणकर, संजयराव देशमुख, उमाळे साहेब, अशोकराव देशमुख, जगन्नाथराव देशमुख, शिवाजीराव पवार, शंकरराव देशमुख यांच्यासह मित्रमंडळातील सदस्य उपस्थित होते. डॉ.गंगाधर विश्वनाथराव कल्याणकर यांच्या या यशाबद्दल कल्याणकर कुटुंबीयांचे मनःपूर्वक अभिनंदन! त्यांच्या हातून गोरगरीब आणि गरजू रुग्णांची सेवा घडो, त्यांच्या वैद्यकीय सेवेचा समाजाला लाभ होवो आणि भावी वाटचाल यशस्वी होवो, हीच हार्दिक शुभेच्छा!

दलित महिला विकास मंडळाचे जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन

दुष्काळग्रस्त बाऱ्हाळीत चारा छावणी सुरु करा

नांदेड/प्रतिनिधी- जिल्ह्यातील दुष्काळी परिस्थिती लक्षात घेता पशुधनाचे संरक्षण करण्यासाठी मुखेड तालुक्यातील बाराहाळी येथे तातडीने चारा छावणी सुरू करावी, अशी मागणी दलित महिला विकास मंडळाच्या वतीने करण्यात आली आहे. यासंदर्भात जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन देण्यात आले आहे.

नांदेड जिल्ह्यातील दुष्काळी परिस्थिती, पाणीटंचाई आणि ग्रामीण भागातील चाऱ्याची कमतरता यामुळे शेतकरी व पशुपालकांसमोर गंभीर संकट उभे राहिले आहे. विशेषतः बाराहाळी परिसरातील जनावरांसाठी पाणी व चारा उपलब्ध होत नसल्याने पशुधन जगविणे कठीण झाले आहे. चारा-पाण्याअभावी जनावरांची कमी दराने विक्री (डिस्ट्रेस सेल) करण्याची वेळ शेतकऱ्यांवर येत असून, यामुळे ग्रामीण अर्थव्यवस्थेवरही परिणाम होण्याची शक्यता निवेदनात व्यक्त करण्यात आली आहे. नोव्हेंबर २०२६ ते जून २०२७ या कालावधीत बाराहाळी येथे चारा छावणी सुरू करण्याचा प्रस्ताव मंडळाने मांडला आहे. या छावणीत सुमारे २०० मोठी जनावरे व ३०० लहान जनावरांची व्यवस्था करण्याचे नियोजन असून, जनावरांसाठी चारा, पाणी, पशुवैद्यकीय सेवा, स्वच्छता व नोंद व्यवस्थापनाची तरतूद करण्यात येणार आहे. यासाठी प्रशासनाने संयुक्त स्थळपाहणी करून छावणीसाठी जागा उपलब्ध करून द्यावी, पशुसंवर्धन विभागाचा नोडल अधिकारी नियुक्त करावा, जनावरांची नोंदणी व आरोग्य तपासणी करावी, तसेच चारा-पाणी पुरवठा आणि शासकीय योजनांचा समन्वय साधावा, अशा मागण्या करण्यात आल्या आहेत. दुष्काळग्रस्त शेतकरी, भूमिहीन कुटुंबे आणि स्थलांतरित पशुपालकांना दिलासा देण्यासाठी प्रशासनाने तातडीने कार्यवाही करावी, अशी मागणी दलित महिला विकास मंडळाच्या वतीने करण्यात आली आहे. मंडळाच्या वतीने ॲड. वर्षा देशपांडे यांनी हे निवेदन सादर केले आहे.

मागासवर्गीय विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षेसाठी प्रोत्साहनपर अनुदान

नांदेड/प्रतिनिधी-जिल्हा परिषद नांदेडच्या स्वउत्पन्नातून देण्यात येणाऱ्या २० टक्के उपकर योजनेंतर्गत मागासवर्गीय गुणवंत विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षेसाठी प्रोत्साहनपर अनुदान देण्यात येणार आहे. या योजनेंतर्गत पात्र विद्यार्थ्यांना प्रत्येकी २० हजार रुपये अनुदान दिले जाणार असल्याची माहिती जिल्हा समाजकल्याण अधिकारी, जिल्हा परिषद नांदेड यांनी दिली आहे.

या योजनेचा लाभ अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती तसेच विमुक्त जाती व भटक्या जमाती प्रवर्गातील ग्रामीण भागातील गुणवंत विद्यार्थ्यांना मिळणार आहे. यापूर्वी या योजनेचा लाभ घेतलेल्या विद्यार्थ्यांना पुन्हा लाभ घेता येणार नाही. योजनेचा लाभ घेण्यासाठी अर्जदाराच्या कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न अडीच लाख रुपयांपर्यंत असणे आवश्यक आहे. तहसीलदारांनी निर्गमित केलेला उत्पन्नाचा दाखला, सक्षम प्राधिकाऱ्याने दिलेला जातीचा दाखला, रहिवासी प्रमाणपत्र, अर्जदार किंवा कुटुंबाचे रेशनकार्डची साक्षांकित प्रत आदी कागदपत्रे अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे. एका कुटुंबातील केवळ एका व्यक्तीस या योजनेचा लाभ देण्यात येणार आहे. अर्जदार विद्यार्थी कोणत्याही शाखेचा पदवीधर असावा. जानेवारी २०२३ पासून अर्ज स्वीकारण्याच्या अंतिम दिनांकापर्यंत एमपीएससी, यूपीएससी, बँकिंग किंवा रेल्वे परीक्षेतील पूर्व अथवा मुख्य परीक्षा उत्तीर्ण असणे आवश्यक आहे. तसेच अर्जदार शासकीय सेवेत कार्यरत नसावा. विद्यार्थ्यांचे वय १८ ते ४३ वर्षे असणे बंधनकारक आहे. सन २०२६-२७ या वर्षात ज्या योजना राबविण्यात येतील त्या योजनेसाठी कोणत्याही एका योजनेस लाभ देण्यात येईल. इच्छुक व पात्र विद्यार्थ्यांनी आवश्यक कागदपत्रांसह अर्ज स्वसाक्षांकित करून आपल्या तालुक्यातील पंचायत समितीच्या गटविकास अधिकारी कार्यालयात सोमवार ० नोव्हेंबर पर्यंत कार्यालयीन वेळेत सादर करावेत. या योजनेतील लाभार्थ्यांची निवड लॉटरी पद्धतीने करण्यात येणार असल्याचेही जिल्हा समाजकल्याण अधिकारी, जिल्हा परिषद नांदेड यांनी कळविले आहे.

हिरामण गोडबोले यांचे निधन

नांदेड/प्रतिनिधी-लोहा तालुक्यातील जवळा (दे) येथील रहिवाशी, सर्वांशी आपुलकीने वागणारे, शांत संयमी ज्येष्ठ नागरिक हिरामण उमजी गोडबोले (९०) यांचे शुक्रवार १३ नोव्हेंबर रोजी सायं. ७ वाजता वृद्धापकाळाने निधन झाले असून आज १४ नोव्हेंबर रोजी सकाळी १० वाजता जवळा (दे) येथील स्मशान भूमीत त्यांच्या पार्थिवदेहावर अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात ६ मुले ३ मुली सुना, जावई, नातु पणतू असा मोठा परिवार आहे. भारतीय सीमा सुरक्षा दलातील जवान साहेब गोडबोले यांचे ते वडील होत. हिरामण गोडबोले यांच्या निधनाने परिसरातील जनतेतून हळहळ व्यक्त करण्यात येत आहे.

पान १ वरुन

डिलिमिटेशन बिलावरुन...

पुनर्रचना करताना महिला आरक्षणाला प्राधान्य मिळाले पाहिजे, असेही त्यांनी स्पष्ट केले होते. अनेक मतदारसंघांमध्ये लोकसंख्या ३० ते ४० लाखांपर्यंत पोहोचल्याने लोकप्रतिनिधींना नागरिकांच्या समस्या सोडविणे अवघड होत असल्याचे त्यांनी सांगितले होते. सुप्रिया सुळे यांच्या या भूमिकेचे स्वागत करताना बावनकुळे यांनी काँग्रेसच्या विरोधावर निशाणा साधला. डिलिमिटेशनला पाठिंबा देणे हे देशाच्या दृष्टीने महत्त्वाचे आहे. मात्र, काँग्रेसकडून या प्रक्रियेला विरोध केला जात असल्याचे सांगत त्यांनी विरोधकांच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले. राष्ट्रवादी काँग्रेसमधील काही नेते सत्तेसाठी हपापलेले असून सत्ताधाऱ्यांसोबत जाण्याच्या तयारीत असल्याची टीका काँग्रेसकडून करण्यात आली होती. या टीकेला प्रत्युत्तर देताना बावनकुळे यांनी काँग्रेसवर जोरदार हल्लाबोल केला. काँग्रेस पक्ष दिवसेंदिवस कमकुवत होत चालला आहे. इंडिया आघाडीला आपल्या घटक पक्षांना सांभाळता येत नाही. आघाडीतील प्रमुख पक्ष असलेल्या काँग्रेसकडे कोणतेही ठोस व्हिजन नाही, तर त्यांच्या नेतृत्वाकडेही दूरदृष्टीचा अभाव असल्याची टीका त्यांनी केली. दरम्यान, सुप्रिया सुळे यांनी डिलिमिटेशनच्या समर्थनार्थ काँग्रेसच्या पूर्वीच्या प्रक्रियेचा उल्लेख केल्याने विजय वडेट्टीवार यांनी नाराजी व्यक्त केली. सध्याच्या डिलिमिटेशन प्रक्रियेत राजकीय फायद्यासाठी सोयीचे मतदारसंघ निर्माण करण्याचा प्रयत्न झाल्यास काँग्रेस त्याला तीव्र विरोध करेल, असा इशाराही वडेट्टीवार यांनी दिला. मतदारसंघ पुनर्रचना पारदर्शक पद्धतीने आणि लोकसंख्येच्या निकषांनुसारच झाली पाहिजे, अशी भूमिका त्यांनी मांडली. दरम्यान, राष्ट्रवादी काँग्रेसच्या दोन्ही गटांच्या संभाव्य विलीनीकरणाच्या चर्चांनीही राजकीय वर्तुळात जोर धरला आहे. उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेतली असून दोघांमध्ये तब्बल दीड तास चर्चा झाल्याची माहिती समोर आली आहे. या भेटीमुळे विलीनीकरणाच्या चर्चांना पुन्हा वेग आला आहे.

ना.संजय शिरसाट यांच्या...

प्रतीक कुटे याने बी.फार्म.चे शिक्षण पूर्ण केले आहे. उच्चशिक्षित तरुणांकडून अशा प्रकारचे कृत्य घडल्याने परिसरात आश्चर्य व्यक्त होत आहे. पोलिसांच्या चौकशीत मिळालेल्या माहितीनुसार, दिवाळीच्या सुटीनिमित्त हे तिन्ही मित्र एकत्र आले होते. त्यानंतर त्यांनी शहरातील एन-१ परिसरात आणि पुढे उल्कानगरी येथे दारूची पार्टी केली. पार्टीदरम्यान त्यांच्याकडील दारू संपल्याने आणखी दारू घेण्यासाठी ते गोलवाडी फाटा परिसरातील एका बारमध्ये गेले. विशेष म्हणजे, हा बार संजय शिरसाट यांच्या निवासस्थानाच्या परिसरातच आहे. बारमधून बाहेर पडल्यानंतर सर्व्हिस रोडवर त्यांची दुचाकी घसरल्याची माहिती तपासात पुढे आली आहे. त्यानंतर हे तरुण परिसरात दोन ते तीन वेळा फिरत असल्याचे समोर आले. त्यांच्या संशयास्पद हालचाली पाहून शिरसाट यांच्या निवासस्थानाबाहेर तैनात असलेल्या सुरक्षारक्षकांनी त्यांची चौकशी केली. तिन्ही तरुण मद्यधुंद अवस्थेत असल्याने सुरक्षारक्षक आणि त्यांच्यात शाब्दिक वाद झाला.

हे वृत्तपत्र प्रकाशक, मालक व संपादक प्रदिप अनंतराव नागापूरकर यांनी मुद्रक अब्दुल गफुर अब्दुल रझाक यांच्या सिमा प्रिंटींग ॲण्ड लिथो प्रिंटींग प्रेस इतवारा बाजार नांदेड, ता.जि.नांदेड येथे छापून नागापूरकर हाऊस, हाऊस नं.१-१०-६९३, विनायकनगर, नवा मोंढा, ता.जि.नांदेड-२ येथे प्रकाशीत केले.आर. एन. आय. नं. ४७१३५/८८ E-mail: nandedwarta@mail.com, मो.९४२२१७४७७४